दैनिक नवीन संध्या
RNI No.MAHMAR/2010/36460
DEC. No. SDM/SR/PUNE/87/2019

# सिटी इंटरनॅशनल स्कूल च्या विद्यार्थ्यांनी दिव्यांग मुलांबरोबर साजरा केला बालदिन



**पुणे :** दिव्यांग मुलांच्या सहवेदनांची विद्यार्थ्यांना जाणीव व्हावी , सेवा मुल्यांची जाण त्यांना व्हावी यासाठी सिटी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दिव्यांग शिक्षण संस्थेला भेट देत तेथील तेथील मुलांसमवेत बालदिन साजरा केला. सिटी इंटरनॅशनल स्कूल च्या इयत्ता सहाव्या इयत्तेतील विद्यार्थ्यांनी गुरूवारी ( दि.१४ ) वानवडी येथील अपंग कल्याणकारी शिक्षण संस्था आणि संशोधन केंद्राला भेट दिली. विद्यार्थ्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दिव्यांगांना प्रेमळ भेट म्हणून चॉकलेटचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या ग्रंथालयाला पुस्तके भेट देण्यात आली.

तसेच शिशूगटातील दिव्यांग विद्यार्थ्यांसमवेत आयोजित केलेला पपेट शो आणि मोठ्या मुलांसाठी दाखविण्यात आलेल्या चित्रपटाचा आस्वादही विद्यार्थ्यांनी घेतला. प्राचार्य अर्चना क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी बोलताना प्राचार्य क्षीरसागर म्हणाल्या, मुले ही विविधरंगी फुलांसारखीच असतात.

या सर्वांच्या एकत्रित येण्यामुळेच जगाला एका मनमोहक बागेचे स्वरूप प्राप्त होत असते.